Cosmos Multidisciplinary Research E-Journal Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal Impact Factor 4.94 ISSN No. 2456-1665

# “अशोककालीन लिपी” ही "धम्मलिपि" की “ब्राम्ही लिपी”

**शरद गंगाधरराव कवानकर**

भारतामध्ये लिखाणाचा इतिहासाची सुरुवात होते ती सम्राट अशोकांच्या शिलालेखांपासून. त्याआधीच्या कुठल्याही लिखाणाचा पुरावा सापडत नाही. काही हरप्पन seals सापडले आहेत मात्र त्यावरची अक्षरे किंवा चित्रे यांच्या बद्दल अजूनही एकमत होत नाही. 1836 साली जेम्स प्रिंसेप यांनी अशोकांच्या शिलालेखांचे सर्वात पहिल्यांदा लिप्यांतरण केले व त्यातील पालि - प्राकृत भाषेच्या शिलालेखांचे सर्वात पहिल्यांदा वाचन झाले. या लिपीला काय म्हणावे हा प्रश्न प्रिन्सेपला देखील पडला होता, मात्र कुठल्याही पुराव्या अभावी त्याने या शिलालेखांच्या लिपिला Indic Script हे नाव दिले. कालांतराने जेव्हा त्याची खात्री झाली कि हे सर्व शिलालेख सम्राट अशोक यांनी लिहिले आहे त्यावेळेस त्याने या लिपिला Ashokan Script देखील म्हटले आहे. पुढे Terrien de Lacouperie याने अशोकांच्या लिपिला "ब्राह्मी" हे नाव दिले. त्याचा आधार होता "ललितविस्तार" या बौद्ध महायानी ग्रंथाचा आणि "समवायांगसूत्र" या जैन ग्रंथांचा. हे दोन्हीही ग्रंथ लिहिले आहेत अंदाजे इ.स. चवथ्या ते सहाव्या शतकात. या ग्रंथांचा आधार घेत Terrien de Lacouperie असे लिहितात की, डावीकडून उजवीकडे लिहिली जाणारी ब्राह्मी लिपि आहे तर, उजवीकडून डावीकडे लिहिली जाणारी खरोष्ठी लिपि आहे

**अशोककालीन लिपिला Terrien de Lacouperie ने आणि इतरांनी ब्राह्मी का म्हटले याची काही कारणे अशी आहेत -**

1. जैन धर्माची अशी समजूत आहे कि भगवान ऋषभदेवाने त्यांच्या मुलीला (जिचे नाव बंभी होते), तिला शिकवताना ज्या लिपीचा उपयोग केला त्या लिपिला मुलीच्या नावावरून " बंभी" हे नाव दिले. मात्र याला कुठलाही शास्त्रीय किंवा अभिलेखीय पुरावा नाही.

2. 13व्या शतकात जन्मलेल्या सायनाचार्य (ज्यांनी निश्चितच आधीचे बौद्ध आणि जैन ग्रंथ वाचले असणार) लिहितात - "ब्राह्मी: ब्राह्मणप्रेरितः यही महत्य: ऋतस्य यज्ञस्य मातरः निर्मात्र्य: स्तुतय:" ब्राह्मणांनी उच्चरलेली आणि स्तुतींमध्ये प्रशंसेसाठी वापरलेली लिपि म्हणजेच ब्राह्मी लिपि होय. याचा आधार म्हणजे नारदस्मृती मध्ये उल्लेख केल्याप्रमाणे ब्रह्मदेवाने निर्माण केलेली लिपि म्हणजे ब्राह्मीलिपी होय.

3. Terrien de Lacouperie चे म्हणणे जार्ज बुह्लेर आणि इतर संशोधकांनी वेगवेगळ्या कारणास्तव लगेच उचलून धरले.

4. प्रा. विश्वभरशरण पाठक या अर्वाचीन संस्कृततज्ञाने ऋग्वेद मध्ये आलेला "ब्रह्मी" शब्द हा वैदिक काळातील असून, अशोकाची लिपि ही वैदिक काळातील "ब्रह्मी" आहे आणि म्हणून तिला "ब्राह्मी" लिपि म्हणावे असे लिहिले आहे. म्हणजेच ब्राह्मी लिपि हिचे अस्तित्व वैदिक काळापासून आहे असे त्यांचे म्हणणे. (परंतु हे वैदिक ग्रंथ पहिल्यांदा जेव्हा लिहिले गेले हा काळ ई.स. नंतर दुसरे ते चौथे शतक होते. याकडे दुर्लक्ष केले गेले.)

5. लगेचच "इथल्या" संशोधकांनी भारताच्या या प्राचीन लिपिला "ब्राह्मी" हे नाव देऊन मोकळे झाले ज्याची री पाश्चात्य किंवा पुरस्कृत संशोधकांनी ओढली.

**उपरोक्त कारणातील वस्तुस्थिती** -

1. ज्या जेम्स प्रिन्सेप ने ही अशोककालीन लिपि शोधून काढली त्याने कधीही या लिपीला ब्राह्मी म्हणून संबोधले नाही. उलट जेव्हा त्याच्या कार्यालयातील ब्राह्मणांनी त्याला हे नाव सुचविले तेव्हा त्याने पुराव्या अभावी धुडकावून लावले व त्याच्या प्रत्येक लिखाणात Indic script किंवा Ashokan script हे शब्द वापरले.

2. मुळातच ललितविस्तार किंवा पन्नवणासूत्र, भगवती व समवायांगसूत्रात लिहिलेली ब्राह्मी व खरोष्ठी लिपि या अशोकालीन लिपीच आहेत याचे कुठलेही पुरावे Terrien de Lacouperie ने दिलेले नाही. तसेच या दोन लिपि सोडून या ग्रंथामध्ये नावे टाकलेली इतर लिपि कोणत्या आणि त्याचे पुरावे काय याचे उत्तर शोधण्यात Terrien de Lacouperie यांना यश प्राप्त झाले नाही.

बौध्द ग्रंथ ललितविस्तारमध्ये पुढील ६४ लिपीचे वर्णन आढळते. ०१. ब्राम्ही २. खरोष्टी ३. पुष्करसारी ४. अंग लिपी ५. बंग लिपी ६. मगध लिपी ७. मांगल्य लिपी ८. मनुष्य लिपी ९. अंगुलीय लिपी १०. शकारि लिपी ११. ब्रम्हवल्ली लिपी १२. द्राविड लिपी १३. कनारि लिपी १४. दक्षिणी लिपी १५. उग्र लिपी १६. संख्या लिपी १७. अनुलोम लिपी १८. ऊर्ध्वधनु लिपी १९. दरद लिपी २०. खास्य लिपी २१. चीन लिपी २२. हुण लिपी २३. मध्याक्षर-विस्तर लिपी २४. पुष्प लिपी २५. देव लिपी २६. नाग लिपी २७. यक्ष लिपी २८. गन्धर्व लिपी २९. किन्नर लिपी ३०. महोरग लिपी ३१. असुर लिपी ३२. गरुड लिपी ३३. मृगचक्र लिपी ३४. चक्र लिपी ३५. वायुमरु लिपी ३६. भौमदेव लिपी ३७. अन्तरिक्षदेव लिपी ३८. उत्तरकुरुव्दिप लिपी ३९. अपरगौडादि लिपी ४०. पूर्वविदेह लिपी ४१. उत्क्षेप लिपी ४२. निक्षेप लिपी ४३. विक्षेप लिपी ४४. प्रक्षेप लिपी ४५. सागर लिपी ४६. वज्र लिपी ४७. लेख-प्रतिलेख लिपी ४८. अनवृत्त लिपी ४९. शास्त्रावर्त लिपी ५०. गणावर्त लिपी ५१. अत्क्षेपावर्त लिपी ५२. विक्षेपावर्त लिपी ५३. पादलिखित लिपी ५४. व्दिरुत्तरपदसंधिलिखित लिपी ५५. दशोत्तरपदसंधिलिखित लिपी ५६. विमिश्रित लिपी ५७. सर्वरुत्संग्रहणी लिपी ५८. विद्यानुलोम लिपी ५९. अध्याहारिणी लिपी ६०. ऋषितपस्तप्त लिपी ६१. धरणीप्रेक्षणी लिपी ६२. सर्वोषधनिष्यन्द लिपी ६३. सर्वसारसंग्रहणी लिपी ६४. सर्वभूतरुद्ग्रहणी लिपी

जैन ग्रंथ पन्नवणासूत्र, भगवती व समवायांगसूत्रात पुढील १८ लिपीचे वर्णन आढळते. ०१. बंभी २. जवणालि ३. दोसापुरिया ४. खरोट्ठी ५. पुक्खरसारिया ६. भोगवईया ७. पहाराइया ८. उपअन्तरिक्खिया ९. अक्खरपिट्ठिया १०. तेवणइया ११. गिराहइया १२. अंकलिवि १३. गणितलिवि १४. गंधव्वलिवि १५ . आदंसलिवि १६. माहेसरी १७. दामित्नी १८. पोलिंदी.

जैन ऋषी भगवान ऋषभदेव यांनी त्यांची पुत्री बंम्मी हिला जी लिपी शिकविली तिला बंभी लिपी असे संबोधले गेले आहे. (बंभीए णं लिविए अट्ठारसविह लिखविहाणे पण्णते. समवायंग सूत्र, अष्टादशस्थानक, पृष्ठ क्रं. ५७)

3. रिचर्ड सालोमन या प्रसिद्ध लिपीतज्ञाने "**Indian Epigraphy**" या ग्रंथात लिहिले आहे कि –

**.....it should be kept in mind that we do not know precisely what form or derivative of the script the authors of the early script lists were referring to as Brahmi nor whether this term was actually applied to the script used in the time of Ashok".**

4. सम्राट अशोकांनी लिहिलेले काही शिलालेखांचे अंश आपण पाहू यात –

**"इयं धंमलिपि देवानांप्रियेन प्रियदसिना राञा लेखापिता.....",**

(गिरनार प्रथम शिलालेख, वाक्य क्र. १)

**"यदा अयं धंमलिपि लिखिता.....",**

(गिरनार प्रथम शिलालेख, वाक्य क्र. ७)

Cosmos Multidisciplinary Research E-Journal Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal Impact Factor 4.94 ISSN No. 2456-1665

**"एताये आठाये इयं धंमलिपि लेखिता.......",**
(गिरनार पाचवा शिलालेख, वाक्य क्र. १५)
**"अथाय अयं धंमलिपि लेखापिता किं च........",**
(गिरनार सहावा शिलालेख, वाक्य क्र. १३)
**"अयं धंमलिपि देवानांप्रियेन प्रियदसिना राञा लेखापिता......"**
(गिरनार चौदावा शिलालेख, वाक्य क्र. १३)
हे सर्व शिलालेख गिरनार येथील आहे.
**"अयं च लिपि तिसनखतेन सोतविया......",**
(धौली शिलालेख, वाक्य क्र. २२)
**"एताये आठाये इयं धंमलिपि लेखित....."**
(धौली शिलालेख, वाक्य क्र. २५)
- हे दोन्ही शिलालेख धौली येथील आहेत.
**"इयं च लिपि आनुचातुंमासं सोतविया तिसेन......."**
(जौगड शिलालेख, वाक्य क्र. १५)
— हा शिलालेख जौगड येथील आहे.
**"हेदिसा च इका लिपि तुफाकंतिकं हुवाति संसलनसि निखिता इकं च लिपिं हेदिसमेव उपासकानंतिकं निखिपाथ......."**
(सारनाथ लघु शिलालेख, वाक्य क्र. ०७)
- हा सारनाथ येथील लघुस्तंभ शिलालेख आहे.
**"सडुवीसतिवस अभिसितेन मे इयं धंमलिपि लेखापिता......",** (सम्राट अशोकाच्या अभिषेकानंतर २६ वर्षानंतर हा लेख कोरण्यात आला. टोपरा शिलालेख, वाक्य क्र. ०२)
**"इयं धंमलिबि अत अथी सिलाथंभानि वा सिलाफलकानि वा तत कटाविया एन एस चिल ठीतिके सिया......"** - हे शिलालेख टोपरा येथील स्तंभावर आहेत.

सम्राट अशोकाच्या या अभिलेखात ज्या व्यक्तींनी अभिलेख तयार करविले त्यांची नावे उद्‌घृत आहेत मात्र कोठेही ब्राम्ही किंवा खरोष्टी लिपी असे लिहिलेले निर्देशनास येत नाही. या लेखात मात्र **देवानांप्रियेन प्रियदसिना राञा लेखापिता** हे वाक्य अनेक ठिकाणी दिसून येते. असे आणखी बरेच शिलालेख, स्तंभलेख अशोकांनी तत्कालिन प्रजेसाठी लिहून ठेवले आहेत. वरील शिलालेखाच्या काही उदाहरणावरून लक्षात येते कि यात "**लिपि**" आणि "**लेखापिता**" किंवा "**लेखिता**" हे शब्द वापरले आहेत. म्हणजेच अक्षर किंवा वाक्य किंवा लेख लिहिण्यासाठी अशोकांनी "**धम्मलिपी**" चा उपयोग केला आहे. काही "स्वयंघोषित लिपितज्ञ" म्हणतात कि अशोकांच्या वाक्याचा अर्थ असा होतो कि **...हा "धम्मलेख" देवांचा प्रिय असलेल्या राजाने लिहिला आहे**" म्हणजे त्यांना असे म्हणायचे आहे कि धम्मलिपी म्हणजे धम्मलेख! पण जर सम्राट अशोकांना धम्मलिपी म्हणजेच धम्मलेख असे सुचवायचे होते तर त्याने स्पष्टपणे लिहिले असते कि "**इयं धम्मलेख ......लेखापिता**". त्याला मग **धम्मलिपी** लिहिण्याचे काही कारणच नव्हते! नाहीतरी लेख हा शब्द अशोकांना माहित होताच ना? दोन्ही ठिकाणी "लेख" लिहिला असतं तर काम झाले असते!

सम्राट अशोकांनी "धम्मलिपि" हा शब्द लिहिला कारण त्याकाळी ज्या काही लिपि अस्तित्वात होत्या, त्यातली "धम्मलिपि" ही दगडावर लिहिण्यास अतिशय योग्य असावी आणि म्हणूनच अशोकांनी या लिपित हे सर्व शिलालेख लिहिले. दुसरे महत्त्वाचे कारण म्हणजे त्यांच्या राज्यातील सर्व लोकांना ही "धम्मलिपि" वाचता येत असावी अन्यथा अशोकांनी सर्व राज्यभर वेगवेगळ्या लिपीत हे सारे लेख लिहिले

असते. तिसरे महत्त्वाचे व्याकरणिक कारण म्हणजे, लिपि आणि लेख या दोन्हीही शब्दाचे धातू वेगवेगळे आहेत. लिपि हा शब्द "लिप" धातू पासून तयार होतो तर लेख हा शब्द "लिख" धातू पासून तयार होतो. हे दोन्हीही शब्द अर्थाने आणि सूचकतेने वेगवेगळे आहेत. लिप म्हणजे लिहिणे आणि लेख म्हणजे जे लिहिले आहे ते. भाषा आणि लिपि यावर भाष्य करताना थोडा व्याकरणाचा देखील अभ्यास हवा!!!

सम्राट अशोकांच्या "**धम्मलिपि**"ला नाकारण्याचे मुख्य कारण म्हणजे येथील भाषातज्ञांना वा लिपीतज्ञांना सम्राट अशोकांच्या "धम्मलिपि" शब्दाबद्दल असलेली मानसिकता. अशा विरोधमूलक मानसिकतेने पछाडलेले हे लोकं सम्राट अशोक यांनी धम्मलिपीच्या सार्वत्रिकरणाच्या प्रयत्नाला दुर्लक्षित करीत आहेत. म्हणून तर "सहा सोनेरी पाने" मध्ये शुंगाचा जयजयकार आहे पण सम्राट अशोकांचे नाव देखील नाही!

भारतात आजमितीस 2.5 कोटी हस्तलिखिते (भूर्जपत्रे, ताडपत्रे, कातडीपत्रे, इत्यादी), ताम्रपत्रे, शिलालेख, स्तंभलेख, प्रस्तरलेख, खापरावरचे लेख, लाकडावरचे लेख आहेत. संशोधकाच्या पाहणीत उपरोक्त पुरातत्वीय एकाही अभिलेखात, वरील माध्यमात "ब्राह्मी" हा शब्द लिपि साठी वापरण्यात आलेला नाही. विशेष म्हणजे अगदी कुटील लिपि, सिद्धमात्रिका लिपि, शारदा लिपि, देवनागरी लिपि अशी नावे अनेक हस्तलिखितांमध्ये येतात, पण "ब्राह्मी" मात्र येत नाही! का? जर "ब्राह्मी" एवढी प्राचीन व पूजनीय आहे तर सम्राट अशोकानंतरच्या राजांनी का बरे तिचा उल्लेख केला नाही? जे बौद्ध आणि जैन ग्रंथांचा उल्लेख करतात, ते हे विसरतात कि हे ग्रंथ इ.स. चवथ्या शतका नंतर लिहिलेले आहेत आणि त्यात अनेक काल्पनिक मांडणी देखील आहे. आज उपलब्ध असलेल्या कुठल्याही ग्रंथापेक्षा अशोकांचे शिलालेख हे सर्वात प्राचीन आणि म्हणूनच विश्वसनिय आहेत. सम्राट अशोकानंतर आलेल्या राजांच्या काळात या धम्मलिपिच्या लिखाणात कालौघात फरक पडला आणि त्यांच्यातील फरक व्यवस्थित अभ्यास करता यावा म्हणून अभ्यासकांनी त्या त्या काळातील शिलालेखांना त्या त्या राज्यकाळाचे नाव दिले. उदा. शुंग लिपि, कुषाण लिपि, गुप्त लिपि....या सर्व लिपि सम्राट अशोकांच्या "धम्मलिपि" तूनच तयार झाल्या आहेत हे लक्षात घेतले पाहिजे. एका संशोधकाने खारवेलच्या शिलालेखाचा उल्लेख केला आहे. या शिलालेखात दुसऱ्या ओळीत लिहिले आहे कि या राजाने बालपणाच्या पंधरा वर्षात लेख, गणन, रुप्य व्यवहार, सामाजिक आणि धार्मिक न्याय शिकला होता. यात लेख म्हणजे लेखन कला, लिपि नव्हे!

आज भारतातील एकही भाषा संशोधक किंवा लिपीतज्ञ "ब्राह्मी" लिपि बद्दल योग्य उत्तर किंवा पुरावा देऊ शकत नाही किंवा पुरावा देऊ शकणार नाही. मात्र तरीही ते ब्राह्मी लिपीच म्हणणार कारण ती त्यांची मानसिकता आहे. ब्रह्म किंवा धर्माशी जोडलेल्या शब्दाला ते नकार कसा देणार? मात्र काही संशोधक "काही झालं तरी आम्ही या लिपिला ब्राह्मीच म्हणणार" यावर अडुन बसले आहेत. जे की, इतिहासाच्या पुरातत्वीय अभिलेखांना नाकारत आहेत असे आपण म्हणु शकतो. संबंधित संशोधकांची कितीही विरोधमुलक मानसिकता असली तरी अशोककालीन लिपी ही धम्मलिपी होय, ती ब्राम्ही लिपी नाही असे आपण ठामपणे म्हणु शकतो.

**संदर्भ :**

पाण्डेय राजबली – भारतीय पुरालिपि (२००४) लोकभारती प्रकाशन २५-A, महात्मा गांधी मार्ग,इलाहाबाद
मुले गुणाकर- भारतीय लिपियों की कहानी (१९७४) राजकमल प्रकाशन नई दिल्ली
मुले गुणाकर – अक्षर बोलते हैं , (२००५) यात्री प्रकाशन दिल्ली
मिश्र नरेश – नागरी लिपि (१९९९) मोनू प्रकाशन दिल्ली
http://www.lankalibrary.com/geo/dera1.html
http://www.hindu.com/2007/12/20/stories/2007122054820600.htm